# महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची पाच वर्षे

जेवढे महत्त्वाचे तेवढच दुर्लक्षित, विस्कळित, अशास्त्रीय, असुरक्षित असे कोणते क्षेत्र असेल तर ते बालशिक्षणाचे. आजच्या बालशाळा, बालकेंद्री आणि शास्त्रीय पद्धतीने कशा चालतील हा आपल्यापुढचा महत्त्वाचा विषय आहे.

हा सत्याचा शोध, सत्याचा बोध हे एकट्या-दुकट्याचे काम नाही. बालशिक्षणाच्या क्षेत्रात काही चांगले घडवू पाहणाऱ्यांची शक्ती संघटीत झाली तरच समाजाच्या जागृतीचे काम प्रभावीपणे होऊ शकेल. सबंध राष्ट्राच्या पातळीवर हे घडायला हवे आहे. परंतु महाराष्ट्र राज्य पातळीवर 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषद' उभी करून, आपण एक नव्या आंदोलनाची सुरुवात केली आहे. देशव्यापी संघटना उभी राहण्याची ही पहिली पायरी आहे.

ही संघटना उभी करण्यासाठी काही जागरूक बाल शिक्षणप्रेमी एकत्र आले. बालशिक्षणाच्या क्षेत्रात पायाभूत काम केलेला गिजुभाई बधेका आणि ताराबाई मोडक यांनी स्थापना केलेला 'नूतन बालशिक्षण संघ' पुढाकार घेणाऱ्यांमध्ये आहे. इतरही काही संस्था आहेत.

भारतीय बालशिक्षणाचे प्रणेते गिजूभाई बधेका यांचा स्मृतीदिन १५ नोव्हेंबर हा आहे. १९३९ साली गिजुभाईंचे निधन झाले. त्यांच्या सहकारी ताराबाई मोडक यांनी, १५ नोव्हेंबर हा दिवस 'बालशिक्षण दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची स्थापना १५ नोव्हेंबर १९९४ या दिवशी समारंभपूर्वक झाली. परिषदेचे सुमारे दीडशे संस्थापक सदस्य, महाराष्ट्राच्या वेगवेगळया विभागांचे प्रतिनिधित्त्व करीत होते. या सर्वांनी याच दिवशी पहिली सर्वसाधारण सभा घेऊन, बालशिक्षणविषयक विविध उद्दिष्टे असलेली घटना संमत केली. परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून प्रा. राम जोशी यांनी सूत्रे हाती घेतली.

'परिषदे' पुढील आव्हान मोठे आहे. कार्य व्यापक आहे. भविष्यकालीन समाजाला शिक्षणाच्या सुरुवातीलाच संस्कारित करण्याचे ध्येय परिषदेसमोर आहे. समाजपरिवर्तनाच्या कार्याची ही पहिली पायरी आहे. आपल्या विधायक शक्ती पणाला लावण्याची ही वेळ आहे.परिषदेने आपली स्थूल उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

**उद्दिष्टे** :

बालशिक्षणविषयक माहिती जमविणे, प्रसिध्द करणे, व तिचा प्रसार करणे. बालशिक्षणविषयक सिध्दांतांचा प्रचार करणे, सैध्दांतिक व व्यावहारिक बालशिक्षण संशोधन करणे, संशोधनास सहाय्य करणे.बालशिक्षणाच्या संदर्भात भाषणे, कार्यशाळा, चर्चासत्रे, अधिवेशन, प्रदर्शने, अभ्यासवर्गांचे आयोजन करून त्यांकरवी प्रबोधन, शिक्षण व प्रशिक्षण करणे.

- बालशिक्षणविषयक शिक्षण - प्रशिक्षण संस्था चालविणे, अशा संस्थांना सहाय्य करणे, ग्रंथालये उभी

करणे, शैक्षणिक साधनांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे. विशेषतः गरीब मागासलेल्या विभागातील मुलांसाठी अल्पखर्ची साधने उपलब्ध व्हावीत यासाठी प्रयत्न करणे.

- बालशिक्षणविषयक संशोधन संस्था, प्रयोगशाळा उभ्या करणे, प्रयोग करणे.
- बालशिक्षणविषयक धोरण ठरविण्यास, कायदे करण्यास सुचविणे व सहाय्य करणे.
- बालशिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने आंदोलन चालविणे.

**परिषदेची पहिली पाच वर्षे**

परिषदेच्या स्थापना - अधिवेशनातच चार ठराव करण्यात आले; आणि हे ठराव आपल्यावर बंधनकारक आहेत, असे मानूनच परिषदेने आपली बालशिक्षण विषयक कार्याची वाटचाल सुरू केली.

या ठरावांपैकी पहिले दोन ठराव महाराष्ट्र सरकारला विनंती करणारे होते. त्यातील पहिला होता तो, यशपाल समितीचा अहवाल शासनाने स्वीकारावा, याकरिता आग्रह धरणारा. आणि दुसरा होता तो, महाराष्ट्र शासनाने बालशिक्षणाचा सर्वांगीण विचार करणारे धोरण अधिकृतरित्या जाहीर करावे यासाठीचा. तिसरा ठराव होता तो पालक, शिक्षक, संस्थाचालक यांना बालशिक्षणाची सद्यस्थिती सुधारण्यासाठी आवाहन करणारा. तर चौथा ठराव, अंतर्गतच होता. तो होता, परिषदेकरवी एक 'बालशिक्षण संशोधन व विकासकेंद्र' उभे करावे, यासाठीचा.

या ठरावांचे स्वरूप पाहिले तर लक्षात येईल की, या ठरावांवरूनच परिषदेच्या कार्याच्या तीन दिशा स्पष्ट होतात; त्या अशाः

१. शासनाला बालशिक्षणाची दखल घ्यायला लावणे.

२. पालक - शिक्षक - संस्थाचालक यांना बालशिक्षणाचा रास्त विचार करायला लावणे, व त्याकरवी बालशिक्षणात सुधारणा घडवून आणणे.

३. बालशिक्षणाच्या क्षेत्रास संशोधनकार्याला स्थान देणे.

परिषदेने याच तीन दिशांनी आपले कार्य पुढे नेले आहे.

**१. शासन आणि बालशिक्षण :**

परिषदेने आपल्या स्थापनेच्या अधिवेशनातच दोन ठराव, महाराष्ट्र शासनाला विनंती करणारे केले होतेः

- यशपाल समितीचा अहवाल स्वीकारावा;
- बालशिक्षणविषयक धोरण निश्चित करावे, व त्यासाठी एक अशासकीय तज्ज्ञांची समिती नेमावी.

शासनाने या सूचना त्वरित स्वीकारून, परिषदेचे अध्यक्ष प्रा. राम जोशी यांच्याच अध्यक्षतेखाली 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती' निर्माण केली (सप्टें. १९९५)या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला (जाने. १९९६) तो पूर्णतया स्वीकारल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीरही केले .

त्यानंतर यासदंर्भात, रामजोशी समितीच्या केवळ एका शिफारसीवर आधारित असा कायदा शासनाने केला. (१९९६) काही अल्पसंख्यांकांच्या शाळांनी विरोध केला. म्हणून शासनाने त्यास एक वर्षासाठी स्थगिती दिली. (जून १९९८) पुढील वर्षीही अशीच आणखी एक वर्षासाठी स्थगिती दिली. (जून. १९९९)

**२. बालशिक्षण विषयक समाजप्रबोधनाचे कार्य :**

परिषदेने ठिकठिकाणी शाखाविस्तार करून बालशिक्षणविषयक समाजप्रबोधन कार्यासाठी यंत्रणा बांधण्याचे ठरविले आहे. सध्या अशा काही शाखा कार्यरत झाल्या आहेत. उदा. पुणे विभागीय शाखा, कोल्हापूर, नांदेड, सोलापूर, अहमदनगर या जिल्हा शाखा. अशाच शाखा इतर जिल्हयांच्या ठिकाणी उघडण्याचा परिषदेचा मानस आहे.

- परिषदेतर्फे तसेच परिषदेच्या शाखांकरवी, व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रदर्शने, शिबिरे, बालनगरी, मातृप्रबोधन वर्ग अशा विविध कार्यक्रमांचेनित्य आयोजन केले जाते. • परिषदेतर्फे व परिषदेच्या शाखांतर्फे, बालशिक्षणाशी संबंधित अशा व ज्यांना बालशिक्षणात रस आहे अशा, व्यक्ती व संस्था यांना परिषदेचे सदस्य म्हणून नोंदविण्याचा मोठया प्रमाणावर प्रयत्न केला जात आहे.
- एक वर्ष मुदतीचा परिषदेने तयार केलेला अभ्यासक्रम खालील ठिकाणी चालविण्यास परिषदेने

परवानगी दिली आहे. दाभोण (जि. ठाणे), मुलुड (मुंबई), पुणे.

**३. बालशिक्षण संशोधन व विकास केंद्राचे कार्य**

या केंद्राचे औपचारिक उदघाटन, डॉ. वि.गो. कुलकर्णी यांच्या हस्ते, १५ नोव्हेंबर १९९५ ला झाले. त्यानंतरच्या काळात पुढील कार्य करण्यात आले. एक वर्ष मुदतीचा 'बालशाळा शिक्षक -प्रशिक्षण' अभ्यासक्रम तयार करणे, त्याची प्रायोगिक स्वरूपावर चाचणी, मूल्यमापन व त्यानुसार सुधारणा घडवणे. हाच अभ्यासक्रम महाराष्ट्र शासनानेही, आपला अभ्यासक्रम म्हणून स्वीकारावा यासाठी प्रयत्न करणे .

दहा दिवसांचा एक 'व्यवस्थापकीय' अभ्यासक्रम केंद्राने तयार केला असून तो वर्षातून दोन वेळा प्रशिक्षण म्हणून दिला जातो. आत्तापर्यंत तीन वेळा हा वर्ग घेण्यात आला.

- स्वयंशिक्षणावर आधारित असा प्रायोगिक स्वरूपावरील दीड वर्षे मुदतीचा 'पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रम केंद्राकडून राबविला जात आहे. या वर्गाचा दुसरा गटअभ्यास सध्या चालू आहे. 'मूल्ये' या विषयावर दीर्घ चर्चासत्र आयोजित करून त्याची व्यावहारिक निश्चिती करण्यात आली.
- संशोधन केंद्राचे संदर्भ ग्रंथालयही निर्माण करण्यात आले आहे.

❖